PUBLICATION – SAKAL
DATE – NOVEMBER 15, 2011
PAGE NO – 8 (PUNE TODAY)

## उद्योगविश्व

# नव्या उद्योगांना मिळाली 'सीप'तर्फे प्रदर्शनाची संधी

पुणे, ता. १४ : सॉफ्टवेअर एक्स्पोर्टर असोसिएशन ऑफ पुणे (सीप) तर्फे आयोजित केलेला 'पुणे कनेक्ट २०११' हा कार्यक्रम नुकताच झाला. यात पुण्यातील नव्या छोट्या कंपन्यांना आयटी क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांच्या प्रमुखांसमोर नव्या कल्पना दाखविण्याची संधी मिळाली. 'सीप'च्या या पुढाकारास टीआयई, ओपन कॉफी क्लब आणि पुणे टेक या संस्थांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाची माहिती देताना 'सीप'चे प्रमुख गौरव मेहता म्हणाले, की 'पुणे कनेक्ट' उपक्रमामध्ये दोन प्रकारच्या कंपन्यांना स्थान देण्यात आले होते. सीपच्या सदस्यांनी निवडलेल्या चार कंपन्यांना 'स्टार्टअप शूटआऊट' या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. यात रेलिस्कोअर, ॲडमोड्यूल, इनोव्हिझ टेक आणि ड्राइड क्लाऊड या कंपन्यांनी त्यांची उत्पादने आणि बिझनेस प्लॅन सादर केले. 'इनोव्हिझ टेक'ने पहिला क्रमांक पटकाविला. 'बेस्ट ऑफ कनेक्ट २०११' म्हणून काही कंपन्यांची निवड झाली.